**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १२ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारताची पुढची २५ वर्षं कशी असतील, याचा आराखडा युवक तयार करत असल्याचे पंतप्रधानांचे प्रशंसोद्‌गार.**
2. **राजमाता जिजाऊंची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी.**
3. **नागपूर शहरातील खेळाडू हेच खासदार क्रीडा महोत्सवाच्या यशाचे शिलेदार असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन: खासदार कंगना रणौत यांच्या उपस्थितीत महोत्सवाचं उद्‌घाटन.**
4. **प्रदेश भाजपाचं अधिवेशन शिर्डी इथं सुरू: राज्यात भाजपचे दीड कोटी सदस्य बनवण्याचे केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे कार्यकर्त्यांना आवाहन.**

विकसित भारत युवा संवाद

भारताची पुढची २५ वर्षं कशी असतील, याचा आराखडा युवक तयार करत आहेत, असे प्रशंसोद्‌गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज काढले. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात युवा नेत्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. स्वामी विवेकानंदांचा सर्वात जास्त विश्वास युवकांवर होता. प्रत्येक समस्येवर युवक उत्तर शोधतील, असा त्यांचा विश्वास होता. त्यावर आपलाही ठाम विश्वास असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

***भारत की युवा शक्ति का सामर्थ्य भारत को जल्द से जल्द विकसित राष्ट्र बनाएगा। आंकड़ों का जो जोड़ भाग करते रहते हैं, उनको लगता होगा ये सब बहुत मुश्किल है, लेकिन मेरी आत्मा कहती है कि लक्ष्य बड़ा जरूर है, लेकिन असंभव नहीं है।***

विकसित भारत युवा नेता संवाद २०२५ अंतर्गत, भारतापुढच्या आव्हानांना तोंड देऊ शकतील, अशा शाश्वत विकासावरचे नवोन्मेषशाली उपक्रम युवकांनी भारत मंडपममधल्या प्रदर्शनात मांडले आहेत. पंतप्रधानांनी या प्रदर्शनाला भेट देऊन या युवकांशी संवाद साधला. तसंच, तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादनं आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकांचं प्रकाशन त्यांनी यावेळी केलं. गेल्या दशकात २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले आहे, अशी माहिती पंतप्रधानांनी यावेळी दिली. गेल्या शुक्रवारपासून सुरू झालेल्या तीन दिवसांच्या विकसित भारत युवा नेते संवादानं तरुणांना विकसित भारतासाठी नाविन्यपूर्ण उपाय सादर करण्यासाठी एक अभुतपुर्व मंच उपलब्ध करून दिला आहे. या कार्यक्रमादरम्यान मोदी यांनी देशभरातील तीन हजार गतिमान तरुण

नेत्यांशी संवाद साधला. विकसित भारत संवादामुळे तरुण नेत्यांना धोरणकर्ते, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील मान्यवरांशी थेट संवाद साधण्याची संधी तसेच देशाचे भविष्य घडवण्यासाठी त्यांच्या कल्पना मांडण्याची संधी मिळाली आहे.

जिजाऊ उत्सव

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री-राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती आज राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राजमाता जिजाऊंचा जन्म झाला होता. जिजाऊंच्या जयंती सोहळ्यानिमित्त बुलढाणा जिल्ह्यातल्या सिंदखेड राजा इथल्या राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्मस्थळी सूर्योदयावेळी शासकीय महापूजा करण्यात आली. केंद्रीय आयुष आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही पूजा झाली.  याप्रसंगी मातृतीर्थ असलेल्या सिंदखेडराजाचं महत्त्व सांगितलं.

***आपण पाहतों की दरवर्षी राष्ट्र माता जिजाउंच्या जन्मोसवासाठी लाखों लोक संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभरातुन या ठिकाणी  जिजाउं मातेचं दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी येत असतात. या सिंदखेडराजा नगरीच नाव या संपूर्ण देशामधे आणि देशाच्या बाहेर एक आदर्श माता, एक आदर्श पुत्र घडवणारी माता म्हणून त्यांना राजमातेचा आणि राष्ट्रमातेचा दर्जा, आणि नामकरण या ठिकाणी झालेला आहे, अशा जिजाऊ मातेचा आज जन्मोत्सव आपण सर्वजन मोठ्या उत्साहामध्ये या ठिकाणी  साजरा करत आहोत.***

यावेळी राजे लखोजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव उपस्थित होते. पुरातत्व विभाग, नागपूर, सिंदखेड राजा नगरपरिषद आणि मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार सुप्रिया सुळे, आमदार सिद्धार्थ खरात यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेऊन अभिवादन केलं. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्तेही शासकीय पूजा करण्यात आली. त्यावेळी ते माध्यमांशी बोलतांना म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांचा जन्मोत्सव हा महाराष्ट्रातील भक्तांसाठी दर्शनाची वर्षभराची शिदोरी असते. राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहोत, असंही ते म्हणाले. या सोहळ्यानिमित्त राजमाता जिजाऊंचं जन्मस्थळ असलेल्या लखुजीराजे जाधव यांच्या राजवाड्याची आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांच्या माळांनी सजावट करण्यात आली होती. दरम्यान, जिजाऊ  जयंतीनिमित्त वाशीम जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात सहाय्यक अधीक्षक सुनील घोडे यांनी जिजाऊच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

स्वामी विवेकानंद जयंती /युवा दिन

स्वामी विवेकानंद यांची आज १६३ वी जयंती आहे. आध्यात्मिक गुरू, तत्वज्ञ-विचारवंत आणि भारतीय संस्कृतीचे प्रणेते असलेल्या विवेकानंदांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून देशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी केली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आज स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. स्वामी विवेकानंद यांनी भारताचा संदेश पाश्चात्य जगापर्यंत पोहोचवला आणि देशवासियांच्या मनात आत्मविश्वास पेरला असं राष्ट्रपती म्हणाल्या. देशाची उभारणी करण्यासाठी, मानवतेची सेवा करण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी तरुणांना प्रेरित केलं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. त्यांचा वारसा अखंड सुरू ठेवण्यासाठी राष्ट्रपतींनी शुभेच्छा दिल्या. स्वामी विवेकानंद यांची जयंती आणि 'राष्ट्रीय युवा दिना' निमित्त नागपूरच्या कामठी इथल्या रनाळा इथं केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर; युवा चेतना मंच, कामठी आणि नेहरू युवा केन्द्र, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन रुक्मिणी मंदीर सभागृहात करण्यात आले.

इस्रो

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला स्पेडेक्स उपक्रमाअंतर्गत डॉकिंग म्हणजेच उपग्रह जोडणीपूर्वी दोन उपग्रहांना स्थिर करण्यात यश आलं आहे. इस्रोने चेसर आणि टार्गेट उपग्रह एकमेंकापासून तीन मीटर अंतरापर्यंत आणण्याचा प्रयत्न यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या प्रयोगादरम्यान मिळालेल्या माहितीचं विश्लेषण केल्यानंतर डॉकिंग प्रक्रिया केली जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे. डॉकिंगनंतर, दोन्ही उपग्रह एकाच अंतराळयानाच्या स्वरूपात नियंत्रित केले जातील.

खासदार क्रीडा महोत्सव

खासदार क्रीडा महोत्सवाचा सातव्या पर्वाचं उद्घाटन आज नागपुरात यशवंत स्टेडियम इथं झालं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि खासदार तसेच सिने अभिनेत्री कंगना राणावत यांनी मॅरेथॉन आणि युवा दौडला हिरवी झेंडी दाखवून महोत्सवाचं उद्घाटन केलं. नागपुरात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी प्रयत्न केले जात असून नागपूरमध्ये साडेतीनशे मैदानं खेळण्यासाठी तयार करायचे आहेत, असं सांगून गडकरी यांनी मैदानी खेळाचं महत्त्व सांगितलं.

***मैं चाहता हूँ कि नागपुर में करीब साढ़े तीन सौ खेल के मैदान तैयार हो और हमारे एक लाख बच्चे, हमारे भाइयों और बहने सुबह शाम हमारे मैदान पर खेले, यही हमारे सबके मन की इच्छा है, नहीं तो हमारे यहाँ मोबाइल फ़ोन पर बच्चे खेल रहे हैं। हमें मैदान पर आकर खेलना है। शरीर स्वास्थ्य को उत्तम रखना है। योगासन हो, प्राणायाम हो फिटनेस यह हमारे एक मंत्र के रूप में हमने स्वीकार किया है।***

नागपूर, विदर्भ आणि महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात खासदार क्रीडा महोत्सव एक उत्तम उदाहरण ठरले आहे. या महोत्सवाच्या यशाचे खरे श्रेय हे दरवर्षी खासदार क्रीडा महोत्सवात सहभागी होऊन मन लावून खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूचं आहे. शहरातील खेळाडू हेच खासदार क्रीडा महोत्सवाच्या यशाचे शिलेदार आहेत, असं प्रतिपादन  गडकरी यांनी यावेळी केलं.

भारतीय जनता पक्ष अधिवेशन

2024 मध्ये भारतीय जनता पार्टीला मोठा विजय मिळाला. या विजयामध्ये राज्यातील जनतेचा आणि लाडक्या बहिणीचा मोठा सहभाग आहे. आता 2025 मध्ये दिल्लीच्या विजयाने भाजपच्या विजयाची सुरुवात होणार असल्याचे सूतोवाच करून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा शंख केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शिर्डी येथे फुंकला. शिर्डी येथे भारतीय जनता पक्षाच्या महाविजय अधिवेशनात ते बोलत होते. यावेळी  त्यांनी  राज्य भाजपची  सदस्यसंख्या दीड कोटी करण्यासाठी कार्यकर्त्यांना आवाहन केले.

***चुनाव के कारण महाराष्ट्र में संगठन पर्व थोड़ा देरी से शुरू हुआ है। मैंने अभी मंच पर अध्यक्ष जी से पूछा बावनकुळे साहब ने बताया 40 लाख सदस्य बने हैं, डेढ़ करोड़ बनाने हैं मगर आज मेरे सामने कार्यकर्ताओं का सागर बैठा है। मैं आपको करबद्ध विनती करने आया हूँ एक भी बूथ ऐसा न हो जहाँ 250 से कम सदस्य हो। ऐसी भारतीय जनता पार्टी बनानी है।***

विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या जनतेनं शिवशाही स्थापन करण्यासाठी अभूतपूर्व यश दिलं आहे. भाजपाच्या आतापर्यंतच्या इतिहासाचं हे सुवर्णशिखर आहे, असं भाजपाचे ज्येष्ठे नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. केवळ सरकार बदलणं नाही तर समाज बदलणं हे भाजपाचं उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राचं सुराज्यात रूपांतर करणं हे आपलं कर्तव्य आहे, असं गडकरी यांनी सांगितलं.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार येत्या काही दिवसांत विदर्भात हवामान कोरडं राहणार आहे. दरम्यान, थंडीची तीव्रता काहीशी कमी झाली असून आज सर्वात कमी तापमानाची नोंद गडचिरोली इथं 13 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली, तर नागपूरचं तापमान 15 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं.

******